ePaper

| वर्ष - 6 । अंक - 109 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | । रविवार । दिनांक 24 जुलै 2022 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## शिवसेनेतील वर्चस्व 8 ऑगस्टपर्यंत सिद्ध करण्याचे ठाकरे, शिंदे यांना आदेश








“ महात्मा फुले यांनी रायगडावरील शिवछत्रपतींची समाधी शोधली. त्यांनी शिवाजी महाराजांचा उल्लेख छत्रपती असा न करता ‘कुळवाडी भूषण’ असा केला. मात्र, पुरंदरे यांनी खोटा इतिहास पसरवला. माझ्या मते शिवछत्रपतींवर इतका अन्याय कोणी केला नाही. अन्य घटकांचे महत्त्व वाढवण्याचे काम त्यांनी केले. शिवाजी महाराजांच्या जडणघडणीत रामदास आणि दादोजी कोंडदेवांचे योगदान काय? पुरंदरे यांनी केलेली मांडणी सत्यावर विश्वास ठेवणारे कधीही मान्य करणार नाहीत.

- शरद पवार, राष्ट्रवादी अध्यक्ष

“ शिवसेना पक्षप्रमुखपदाचा निर्णय बाळासाहेब ठाकरेंचा होता. महाबळेश्वरला असताना मी सांगितलं की मला तुमच्या मनात (बाळासाहेब ठाकरे) काय आहे, हे माहिती आहे. उद्धव ठाकरेंना तुम्ही अध्यक्ष करा. पण जाहीर मला करु द्या. कारण मग राज की उद्धव हा विषय बंद होईल. त्याप्रमाणे मी विषय बंद केला. पश्चात्ताप करण्याचा विषय नव्हता.

- राज ठाकरे, मनसेप्रमुख



# महापालिका निवडणूक ऑक्टोंबरमध्ये शक्य!

## सर्वसाधारण आरक्षण रद्द होण्याची शक्यता... एससी, एसटीची आरक्षण सोडत कायम राहणार

**पिंपरी । । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

तीन सदस्यांचाच प्रभाग कायम ठेवून ऑक्टोंबर च्या दरम्यान महापालिका सार्वत्रिक निवडणूक होण्याची दाट शक्यता आहे. पूर्वी काढलेले एसटी, एसटी प्रवर्गाचे आरक्षण कायम ठेवत सर्वसाधारण जागांतून ओबीसी आरक्षणाची सोडत काढण्यात येणार आहे. सर्वोच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणासह स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घेण्यास परवानगी दिली आहे. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणूक शाखेने काढलेली आरक्षण सोडत रद्द होणार असून नव्याने आरक्षण सोडत काढली जाईल. दरम्यान, एससी, एसटीची आरक्षण सोडत



कायम राहणार आहे.

पिंपरी महापालिकेत 139 जागा असून यामध्ये 70 महिला आणि 69 पुरूषांसाठी जागा राखीव आहेत. यामध्ये अनुसूचित जातीसाठी (एससी) 22 जागा राखीव आहेत. त्यात 19, 41, 20, 18, 37, 43, 34, 24, 35, 11, 14 या प्रभागात महिलांसाठी 11 जागा राखीव झाल्या आहेत. तर, 2, 16, 17, 18, 22, 25, 29, 32, 37, 38, 39, 44, 46 या 11 जागा एससी पुरुषासांठी राखीव आहेत. तर, अनुसूचित जमाती (एसटी) महिलांसाठी 44, 41 राखीव झाली आहे. तर, प्रभाग क्रमांक 6 मधून एसटी समाजातील पुरुष, महिलेला लढता येईल. 31 मे 2022 रोजी काढलेली ही एससी, एसटीची आरक्षण सोडत कायम राहील. केवळ सर्वसाधारण आरक्षण सोडत रद्द होईल..ओबीसी समाजाला आरक्षण मिळाल्याने सर्वसाधारण आरक्षण सोडत रद्द झाली आहे. सर्वसाधारणामधून ओबीसींसाठी आरक्षण सोडत काढण्यात येणार आहे. ओबीसी समाजाला मिळालेल्या आरक्षणानुसार अंदाजे ओबीसींसाठी 30 ते 35 जागा राहतील. त्यातील निम्या जागा महिला आणि निम्या जागा पुरुषांसाठी राहतील.

### चार सदस्यांचा प्रभाग ही निव्वळ चर्चाच

राज्यातील महापालिका तसेच जिल्हा परिषदांमधील आरक्षण सोडत नव्याने जाहीर करण्यात येणार आहे. या परिस्थितीत महापालिकांमध्ये चार सदस्यांचा प्रभाग करणे इच्छा असली तरी राज्य सरकारला शक्य नाही. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून महापालिकांमध्ये चार सदस्यांचा प्रभाग करण्याची सुरू झालेली चर्चा केवळ चर्चाच राहणार आहे.



महाविकास आघाडी सरकारने मुंबई वगळता राज्यातील सर्व महापालिकांमध्ये तीन सदस्यांचा प्रभाग करण्याचा निर्णय घेतला होता. चार सदस्यांचा प्रभाग असावा, अशी भारतीय जनता पार्टीची सुरवातीपासूनची भूमिका आहे. आता राज्यात सत्ता बदल झाला आहे. भाजपा सत्तेत आली आहे. त्यामुळे चार सदस्यांचा प्रभाग होईल, अशी आशा सर्वसामान्य कार्यकर्त्यांमध्ये निर्माण झाली आहे. भारतीय जनता पार्टीचे नेते आमदार चंद्रशेखर बावनकुळे यांनीदेखील या प्रकारची मागणी केली आहे. त्यामुळे सरकार चार सदस्यीय प्रभाग पद्धतीचा निर्णय घेईल, अशी अटकळ होती. मात्र, निवडणूक आयोगाकडून निवडणुकीची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. आरक्षण सोडतीचा कार्यक्रम नव्याने जाहीर केला आहे. या परिस्थितीत चार सदस्यांच्या प्रभागाचा निर्णय होणे शक्य नसल्याचे सांगण्यात येत आहे.

# तरूणींची छेड करणाऱ्या २७ सडक सख्याहरींवर कारवाई

## 153 जणांकडून दीड लाख रुपये दंड वसूल, दोन जणांविरुध्द गुन्हे दाखल

**। पिंपरी ।। महाईन्यूज ।**

शाळा व महाविद्यालय परिसरात विनाकारण फिरणाऱ्या तसेच तरूणींची छेडछाड करणाऱ्या सडक सख्याहरींची पिंपरी-चिंचवड पोलिसांनी विशेष मोहीम राबवून अक्षरशः धुलाई केली. या कारवाईत २५ जणांवर कारवाई करण्यात आली असून दोन



जणांविरूध्द गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. तर, १५३ जणांविरूध्द मोटार वाहन कायद्यान्वये कारवाई करून दीड लाख रूपये दंड वसूल करण्यात आला आहे.

शाळा, महाविद्यालयांचे आवार तथा लगतच्या परिसरात तरूणींची मोठ्या प्रमाणात छेडछाड होत असल्याच्या तक्रारी पोलिसांकडे येत होत्या. पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनी त्याची दखल घेतली. पिंपरी पोलीस आयुक्तालयाच्या पथकाने २२ जुलैला विशेष मोहीम राबवून ६७ ठिकाणी कारवाई केली. विनाकारण फिरणाऱ्या तरूणांना पोलिसांनी ‘प्रसाद” दिला. तर, अनेकांवर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात आली.

यापुढेही अशाप्रकारे धडक मोहीम राबवण्यात येणार असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक रावसाहेब जाधव यांनी सांगितले. शाळा, महाविद्यालय परिसरात गैरकृत्य करताना आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई केली जाणार आहे. आपल्या परिसरात छेडछाडीचा प्रकार आढळून आल्यास पोलीस नियंत्रण कक्ष (९५२९६९१९६६) आणि हेल्पलाईन क्रमांक ११२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## शॉर्ट न्यूज »

### श्रावणात केळी पाच रुपयांनी महाग?



। पुणे । महाईन्यूज ।

केळ्यांसाठी जगप्रसिद्ध असलेल्या जळगाव जिल्ह्यात काढणीयोग्य केळीचे प्रमाण कमी झाले आहे. तर उत्तर भारतातील श्रावण महिना १४ जुलैपासून सुरू झाला आहे. तिथे श्रावणात होणाऱ्या जत्रा-यात्रांमुळे केळ्यांची मागणी वाढली आहे. अरब देशांत होणारी केळीची निर्यातही सुरळीत आहे. परिणामी त्यांचे दर तेजीत आहेत. सध्या दर्जानुसार ४० ते ५० प्रति डझन दराने केळी मिळत आहेत. महाराष्ट्रातील श्रावण महिना सुरू झाल्यानंतर त्यात सरासरी पाच रुपयांनी वाढ होण्याची शक्यता आहे. उष्णतेच्या लाटेसह विविध कारणांमुळे यंदा केळीच्या लागवडीवर परिणाम झाला आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संभाजी ठाकूर यांनी दिली.

# खोळंबलेल्या मंत्रीमंडळ विस्तारावरुन शरद पवारांचा शिंदे-फडणवीसांना टोला

## पुण्यामध्ये पत्रकारांनी प्रश्न विचारला असता पवारांनी केली शिंदे सरकारवर टीका

। पुणे। महाईन्यूज ।

राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी राज्यात नव्याने सत्तेत आलेल्या शिंदे सरकारच्या रखडलेल्या मंत्रीमंडळ विस्तारावरुन केंद्र आणि राज्यातील नेतृत्वावर टीका केली आहे. पुण्यामध्ये एका कार्यक्रमानंतर पत्रकारांशी संवाद साधताना शरद पवार यांना राज्यातील मंत्रीमंडळाचा विस्तार रखडला असून त्यासंदर्भात प्रतिक्रिया विचारली. यावर उत्तर देताना पवार यांनी सत्ता एककेंद्रीत करण्याच्या विचाराने दोघेच कारभार पाहत असल्याचा टोला लगावला.

गेल्या पाच दिवसांमध्ये दुसऱ्यांदा दिल्ली दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह शुक्रवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. त्यानंतर राज्यातील मंत्रीमंडळ विस्ताराचा मार्ग सुकर झाल्याचे मानले जात आहे. मात्र यासंदर्भात कोणतीही निश्चित माहिती समोर आलेली नाही. असं असतानाच आता पवार यांनी मंत्रीमंडळ विस्तारावरुन शिंदे सरकारबरोबरच केंद्रीय नेतृत्वावर टीका केलीय.



**गेल्या पाच दिवसांमध्ये दुसऱ्यांदा दिल्ली दौऱ्यावर आलेल्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह शुक्रवारी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली. त्यानंतर राज्यातील मंत्रीमंडळ विस्ताराचा मार्ग सुकर झाल्याचे मानले जात आहे. मात्र यासंदर्भात कोणतीही निश्चित माहिती समोर आलेली नाही.**

मंत्रीमंडळ विस्तारासंदर्भात विचारले असता पवार यांनी, "सरकारच असं चालवायचं आहे. दोघांनीच संपूर्ण सत्ता केंद्रीत ठेऊन सरकार चावलायचं ही भूमिका स्वीकारलेली दिसते," असं मत व्यक्त केलं. तसेच पुढे बोलताना शिंदे आणि फडणवीस यांच्या या भूमिकेला केंद्र आणि राज्यातून पाठिंबा असल्याचं दिसत आहे असंही पवार म्हणाले. "दोघांनीच सरकार चालवण्याला त्यांचे राज्यातील सहकारी आणि देशातील नेतृत्व या दोघांचीही संमती आहे. त्यामुळे हे सहाजिक आहे. ते सत्ताधारी आहेत. ते जे करतील ते आपल्याला स्वीकारावं लागेल," असं पवार म्हणाले. दरम्यान, शुक्रवारी दिल्ली दौऱ्यावर असणाऱ्या मुख्यमंत्री शिंदे यांनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांच्याशी चर्चा झाली असून, मंत्रिमंडळ विस्तारामध्ये कोणतीही अडचण राहिलेली नाही, असं स्पष्ट केलं होतं. तसेच विधिमंडळ अधिवेशनापूर्वीच हा निर्णय घेतला जाईल. मंत्र्यांची यादी मात्र मुंबईत गेल्यावर निश्चित करू, असे मुख्यमंत्री शिंदे यांनी सांगितलं. त्यामुळे पुढील दोन-तीन दिवसांमध्ये शिंदे गट-भाजप युतीचे व्यापक मंत्रिमंडळ स्थापन होऊ शकेल.

# आकांक्षाने उंचावली पिंपरी-चिंचवडकरांची मान, पटकावला सर्वोत्कृष्ट बालकलाकाराचा राष्ट्रीय सन्मान

पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

यावर्षीचे राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार (National Film Award) काल (ता.२२) दिल्लीत जाहीर झाले. त्यात सर्वोत्कृष्ट बालकलाकाराची मानकरी पिंपरी-चिंचवडकर आकांक्षा पिंगळे ठरली. त्याबद्दल तिच्यावर काल रात्रीपासून अभिनंदनाचा वर्षाव सुरु आहे. सुमी या मराठी बालचित्रपटातील भुमिकेसाठी तिला हा पुरस्कार मिळाला आहे. पहिल्याच सिनेमासाठी तो मिळाल्याबद्दल तिने 'सरकारनामा'शी बोलताना अतीव आनंद व्यक्त केला.

नुकतेच दहावीच्या परीक्षेतही आकांक्षाने असेच घवघवीत यश



(८४ टक्के गुणे) मिळवलेले आहे. वडिलांसह कुटुंबाला या पुरस्काराचे श्रेय तिने दिले. अभ्यास आणि अभिनय या दोन्हींवर लक्ष देणार असल्याचे तिने सांगितले. ती मूळची खेड तालुक्यातील (जि. पुणे) कोहिंडे बुद्रूक गावची आहे. तेथूनही तिच्यावर कालपासून अभिनंदनाचा वर्षाव सुरु झालेला आहे. तिचे वडील लक्ष्मण पिंगळे हे एका खासगी कंपनीत कामाला असून आई गृहिणी आहे.

### `सिंघम` मधील सोनालीच्या भुमिकेने कलाटणी दिली `सुमी` तथा आकांक्षाला

**`सिंघम` या सुपरहिट हिंदी सिनेमात काम केलेली मराठी अभिनेत्री सोनाली कुलकर्णी हिचे तिसरीत असताना आकांक्षाने म्हटलेले डायलॉग ऐकून तिचे वडिल प्रभावित झाले. त्यांना आपल्या मुलीमधील स्पार्क समजला आणि तिच्यातील या सुप्त कलागुणांना त्यांनी वाव देण्याचे ठरवले. रांजणगावच्या गणपतीवर पहिली स्क्रिप्ट तिला मिळाली. यूट्यूबवर २००९ ला नऱ्या या लघूपटापासून तिची सुरवात खऱ्या अर्थाने झाली. नंतर तिने स्वराज्यरक्षक संभाजी व आणखी एका मालिकेत काम केले.**

या दोघांकडेही आपल्या मुलीच्या कौतुकाला शब्द नव्हते. एवढा आनंद झाला आहे, की तो शब्दांत व्यक्त करू शकत नाही, असे हे दोघेही म्हणाले.

त्यांना दोन मुली आहेत. त्यातील आकांक्षा ही मोठी, तर आराध्या लहान आहे. सुमी या ग्रामीण भागातील मुलीची शिक्षणासाठीची धडपड आणि अखेरीत तिने साध्य केलेले तिचे ध्येय हे सुमी या चित्रपटात दाखवण्यात आली आहे.

त्यातील सुमिची भुमिकी मी केली आहे, असे आकांक्षा हिने सांगितले. तर, आता तिने सर्वोत्कृष्ट बालकलाकार म्हणून पुरस्कार पटकावला. आपल्या अभिनयातील चुणूक तिने पहिल्याच सुमी या बालचित्रपटातून राष्ट्रीय स्तरावर दाखवून दिली. 'सुमी'ला एकूण चार पुरस्कार मिळाले आहेत. सर्वोत्कृष्ट बाल चित्रपट, तर तो ठरलाच. शिवाय सर्वोत्कृष्ट बालकलाकार (मुलगी) आकांक्षा आणि (मुलगा) दिव्येश इंदूलकर हे ठरले.

सुवर्णकमळही या चित्रपटाने पटकावले आहे, अशी माहिती लक्ष्मण पिंगळे यांनी दिली. आकांक्षा ही पिंपरीत संत तुकारामनगर येथे राहते. हा प्रभाग माजी महापौर योगेश बहल यांचा आहे. आपल्या प्रभागातील मुलीने राष्ट्रीय पुरस्कार मिळवल्याचे कळताच काल रात्रीच ते आकांक्षाच्या घरी गेले.





### पुणे जिल्ह्यातील आदिवासी शाळांना साहित्य वाटप

# सेवाभावी वृत्तीने काम करणे हेच भाजपाचे संस्कार!

## भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांच्या भावना

पिंपरी । । महाईन्यूज । प्रतिनिधी।

देशातील शेवटच्या घटकाचा विकास आणि सेवाभावी वृत्ती हा भाजपाचा विचार आहे. त्यामुळेच आज आदिवासी समाजातील पहिली महिला राष्ट्रपती म्हणून श्रीमती द्रौपदी मूर्मु यांना संधी मिळाली. मावळते राष्ट्रपती रामनाथ कोविद यांनीही आपली कारकीर्द यशस्वी केली. देशातील वंचित, दुर्लक्षित समाजाच्या हितासाठी भाजपाचे योगदान आहे. देशातील सामान्य व्यक्ती सर्वोच्चपदापर्यंत आपण पोहोचू शकतो, असा विश्वास विश्वास भाजपाने देशवासियांच्या मनात निर्माण केला, अशा भावना भाजपा शहराध्यक्ष व आमदार महेश लांडगे यांनी व्यक्त केल्या.

देशाच्या राष्ट्रपतीपदी श्रीमती द्रौपदी मूर्मु यांची निवड झाल्याबद्दल तसेच राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त 'एक हात मदतीचा' या उपक्रमांतर्गत आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने पुणे जिल्ह्यातील आदिवासी शाळांमध्ये शालेयपयोगी साहित्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्यात आले. यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे हेमंत हरहरे, विनायक थोरात, जनजाती सुरक्षा मंचचे ॲड. किरण गभाले, अशोक गभाले, निलेश साबळे, दिलीप देशपांडे, अमोल डमरे, सुरेश कौदरे, विश्व हिंदू परिषद, बजरंग दल, वनवासी कल्याण समितीचे पदाधिकारी, सर्व शाळांचे मुख्याध्यापक, प्राचार्य, संस्थांचे पदाधिकारी- कर्मचारी उपस्थित होते.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, खरोशी, ता. खेड, शिवाजी विद्यालय व कला व वाणिज्य महाविद्यालय, डेहणे, ता. खेड, शिवशंकर विद्यालय व चिंतामनराव मोरमारे कनिष्ठ विद्यालय, तळेघर, ता. आंबेगाव, श्री. पंढरीनाथ कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, मु.पो. पोखरी, ता. आंबेगाव, विश्व हिंदू परिषद वनवासी विद्यार्थी वसतीगृह, राजगुरूनगर, ता. खेड, कुंडेश्वर विद्यालय, पाईट, ता. खेड, सेवाग्राम ट्रस्ट माळेगाव, ता. मावळ, जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा, भरतवाडी, कल्याण आश्रम, पोखरी, ता. आंबेगाव, आदी शाळांमध्ये शैक्षणिक साहित्य आणि दैनंदिन वापराच्या वस्तू भेट स्वरुपात देण्यात आले. एकूण ८ शाळांमध्ये संगणक, खुर्च्या, टेबल, ग्रंथालयातील साहित्य, ब्लॅक बोर्ड, छत्री, रेनकोट, इलेक्ट्रिक आवश्यक साधने, किराणा सामान आदी सुमारे २० लाख रुपयांचे साहित्य भेट देण्यात आले. विशेष म्हणजे, काही शाळांचे थकीत वीजबिलही भरण्यात आले आहे.

आमदार लांडगे म्हणाले की, समर्पण आणि सेवाभाव हाच भाजपाचा संस्कार आहे. "जनसेवा हीच ईश्वरसेवा" या भावनेतून आदिवासी शाळांना शालेयपयोगी व जीवनावश्यक साहित्य भेट दिले. दि. २२ व २३ जुलै असे दोन दिवस स्वतः उपस्थित राहून सुमारे २ हजार ३०० विद्यार्थ्यांना थेट मदत करता आली, याचे विशेष समाधान वाटते.

### नरेंद्र मोदींनी राजकीय घराणेशाही मोडीत काढली...

२०१४ पर्यंत आपल्या देशात विशिष्ठ घरातीलच पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकप्रतिनिधी, आमदार आणि खासदार अशी भावना होती. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राजकीय घराणेशाही मोडीत काढली आणि सामान्य कुटुंबातली व्यक्तिसुद्धा देशाच्या सर्वोच्च पदावर बसू शकते, हा विश्वास भारतवासीयांना दिला. त्यामुळे राष्ट्रपती मूर्मु यांचा विजय **आम्ही** आदिवासी बांधवांना पेढे- मिठाई वाटून साजरा केला आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा वाढदिवस आम्ही आदिवासी मुलांना शालेय साहित्य भेट देऊन साजरा केला. केवळ भोसरी विधानसभा मतदार संघाचा आमदार म्हणून नाही. तर राज्याचा विधिमंडळ सभागृहाचा सदस्य म्हणून कोणत्याही दुर्लक्षित घटकांच्या अडचणी सरकारसमोर मांडू शकतो. त्यामुळे यापुढील काळात मला कधीही हाक द्या मदतीसाठी तत्पर राहीन, असा विश्वास आमदार लांडगे यांनी संबंधित शिक्षण संस्थांना यावेळी दिला.

# "मौजमजेसाठी पाच-दहा हजारांत विकल्या चोरीच्या दुचाकी

## पोलिसांनी आवळल्या आरोपीच्या मुसक्या"

। पिंपरी-चिंचवड। महाईन्यूज । प्रतिनिधी।

मौजमजेसाठी चोरलेल्या दुचाकींची केवळ पाच ते १० हजारांत विक्री केली. याप्रकरणी सराईतास हिंजवडी पोलिसांनी अटक केली. त्याच्याकडून १५ दुचाकी जप्त केल्या. असिफ शेरखान पठाण (वय २१, रा.मुळशी, मुळ रा. मोहोळ, सोलापूर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वाहन चोरी करणाऱ्या टोळीचा शोध हिंजवडी पोलीस घेत असताना त्यांना



रामनगर, बावधन परिसरात एक इसम संशयीतरित्या फिरताना दिसला. यावेळी पोलिसांनी त्याच्याकडे चौकशी असता त्याने उडवा-उडवीची उत्तरे दिली. पोलिसांनी अधिक चौकशी केली असता त्याने परिसरात वाहन चोरीसाठी आल्याचे सांगितले. त्याला अटक करून पोलिसांनी तपास केला.यामध्ये त्याच्यावरील हिंजवडी पोलीस ठाणे येथील २, शिवाजीनगर पोलीस ठाण्यातील २, सिंहगड पोलीस ठाण्यातील २, भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यातील २, वारजे पोलीस ठाण्यातील २ तर दत्तवाडी कोथरूड, चंदननगर पोलीस ठाण्यातील प्रत्येकी एक असे १३ गुन्हे उघड झाले आहेत. तर दोन दुचाकीची कोणतीही तक्रार अद्याप पोलिसांकडे नाही. असा एकूण चार लाख ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. तर पठाणचे दोन साथीदार नितीन पांडुरंग साबळे व अनिकेत अमर ढगे हे फरार असून यातील ढगे याच्यावर २०१७ मध्ये मोका अंतर्गत बिबेवाडी पोलिसांनी कारवाईकेली होती. वाकड विभागाचे सहायक पोलीस आयुक्त श्रीकांत डिसले, हिंजवडीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. विवेक मुगळीकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सुनील दहिफळे, सोन्याबापू देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक सागर काटे, रामग गोमारे, सहायक उपनिरीक्षक बंडू मारणे, नितीन साळुंके, बाळकृष्ण शिंदे, पोलीस कर्मचारी आबा सावंत, बापू धुमाळ, कैलास केंगले, विक्रम कुदळ, योगेश शिंदे, रितेश कोळी, अरुण नरळे, श्रीकांत चव्हाण, चंद्रकांत गडदे, अमर राणे, कारभारी पालवे, ओमप्रकाश कांबळे, दत्तात्रय शिंदे यांच्या पथकाने ही कारवाई केली. कागदपत्र नंतर देतो म्हणून गाड्यांची विक्रीचोरी केलेली वाहने आरोपींनी ग्रामीण भागात विक्री केली. २० ते ३० हजार रुपये किंमत सांगून पाच ते १० हजार रुपये घेऊन कागदपत्रे नंतर देतो, असे सांगून आरोपी वाहनांची विक्री करीत होते.

## संपादकीय »

# उत्साहाचा उन्माद नको...

***गणेशोत्सव निर्बंधमुक्त करण्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निर्णयामुळे सध्या राज्यभरातील मंडळांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. यंदा गणेशमूर्तींवर ना उंचीची मर्यादा असेल, ना हमीमत्र लिहून देण्याचे बंधन. करोनाच्या सावटाखाली दोन वर्षे अनेक निर्बंधांच्या चौकटीत गणेशोत्सव साजरा झाला. दहीहंडीचा थरारही अनुभवता आला नव्हता.***

यंदा जागतिक पातळीवर आकर्षणाचे केंद्र असलेल्या या उत्सवांचे महाकाय रूप पुन्हा जगाला दिसेल. या निर्णयामुळे कार्यकर्त्यांमध्ये पुन्हा एकदा ऊर्जा संचारली असली, तरी भव्यतेची परंपरा जपण्यासाठी मंडळांना अनेक अडचणींची विघ्नेही पार करावी लागतील. यात प्रमुख प्रश्न आहे आर्थिक गणित जुळवण्याचा. एकट्या मुंबईत १२ हजारांहून अधिक गणेशोत्सव, तर दोन हजारांच्या घरात दहीहंडी मंडळे आहेत. बहुतांश मंडळांची तिजोरी रिकामी आहे. मंडळांना मिळणारी वर्गणीही बंद आहे; त्यामुळे यंदा खर्चाचा ताळमेळ जुळवण्यासाठी सगळ्यांना तारेवरची कसरत करावी लागेल. यापूर्वी गणेशमूर्तींच्या उंचीबाबत संभ्रम असल्यामुळे, मूर्तिकारांनी ठरावीक मंडळांच्या मूर्ती घडवण्याची तयारी दर्शवली होती. आता सरकारने मूर्तींवरील निर्बंध उठवले असले, तरी केवळ एक महिन्यात सर्व मंडळांच्या अपेक्षा पूर्ण करणे मूर्तिकारांना शक्य नाही.

निर्बंधमुक्तीच्या या निर्णयातून महापालिका निवडणुकांचे पडघमही वाजू लागले. मुंबईतील बहुतांश गणेशोत्सव मंडळे वर्षानुवर्षे शिवसेनेशी संलग्न आहेत. बाळासाहेब ठाकरे यांना अपेक्षित असलेली हिंदुत्वाची धुरा आपणच सक्षमपणे पेलत असल्याचा संदेश देत, मंडळांना आपल्याकडे वळवण्याचा प्रयत्न उत्सवांच्या माध्यमातून शिंदे गट करीत आहे, हे उघडच आहे. करोनाकाळात केलेले कार्य, त्यांना अपेक्षित असलेले सहकार्य या सगळ्याकडे महाविकास आघाडी सरकारने दुर्लक्ष केल्याची भावना मंडळांमध्ये आहे. या नाराजीचा फायदा घेत कार्यकर्त्यांची मने जिंकण्याचा प्रयत्न शिंदे यांच्याकडून सुरू आहे. मुख्यमंत्र्यांनी जी साद घातली आहे, तिला मंडळांकडून कसा प्रतिसाद मिळतो, याचे उत्तर गणेश मंडपांच्या प्रवेशद्वारावर कोणाचे फलक झळकतात, दहीहंडीत बनियनवर कोणाचे चेहरे चमकतात, यातून मिळेल. त्यातून स्पर्धा झाली तर ठीक, संघर्ष मात्र होऊ नये. उत्सवातील या राजकीय शक्तिप्रदर्शनाच्या पलीकडे जात, लोकमान्य टिळकांना अपेक्षित असलेल्या आदर्श गणेशोत्सवाचे भान जपण्याची जबाबदारी मंडळांवर आहे. करोनाकाळात रक्तदान शिबिरे असोत वा रुग्णांना मदत असो, सर्वच स्तरावर मंडळांनी बजावलेली भूमिका कौतुकास्पद होती. त्यासोबतच आता पर्यावरणपूरक उत्सवाची धुराही मंडळांनी पेलावी. 'प्लास्टर ऑफ पॅरिस'मुळे पर्यावरणाला निर्माण झालेला धोका जगजाहीर आहे.



## आनंदी सकाळ

# जनहितासाठी कृतिशील व्हावे...

वैदिक धर्माचा उत्कर्ष, धर्म-विज्ञान, अध्यात्म-जीवन यांची परस्पर एकरूपता, जनसामान्यात ज्ञानाचा प्रसार व मूल्य जाणिवांचा विकास, लोपलेल्या उदात्त परंपरा, संस्कृतीचे काळानुरूप नवे आचार, भारतीय माणसातली दबलेली शौर्य भावना, अस्मिता व राष्ट्रीयतेची उन्मेष, बंद पडलेले कारखाने पुन्हा सुरू करणे, तंत्र-मंत्राच्या ओंगळ पसाऱ्याला काबूत आणून जरब बसवणे, प्रपंच अध्यात्ममय करुन समृद्ध व्यक्तिमत्वाची पिढी घडवणे, शेतकऱ्यांना अध्यात्माचा आधार देऊन संतांचे स्वप्न व कार्य पूर्ण करणे, ढासळलेली कुटुंबव्यवस्था पुन्हा मजबूत व निष्ठावान करणे, दु:खितांना उपाय देऊन जीवनात उभे करणे, सकारात्मक बनवणे, बहुजन समाजाला वैदिक ज्ञानपरंपरेची योग्य मीमांसा करून सोप्या भाषेत ते उपलब्ध करुन देणे, युवा पिढीला रोजगाराच्या नव्या दिशा देणे, शासनाला जनहितासाठी कृतिशील करणे... अशी एका ना अनेक उज्ज्वल कार्ये प्रत्येकक्षणी दादांनी केली.

# उच्च, उदात्त आणि उन्नत असे तत्त्व...



## भूमिका



बदल झाला की आशा पालवतात, हा मनुष्यस्वभाव आहे. त्यामुळे सत्ताबदल कुठलाही, कुठेही, कशाही पद्धतीने झालेला असो, आता सारे चांगले होणार, असे वाटल्यास काहीही गैर नाही. त्यात महाराष्ट्रातील सत्तापालट हा तर हिंदुत्वासाठी झालेला. ते काय हे समजा कुणाला नाही नीटसे सांगता आले, तरी ते एक उच्च, उदात्त आणि उन्नत असे तत्त्व आहे हे सर्वांनाच माहीत. त्यामुळे आशा समजा आणखीच उंचावल्या, तरी चालेल. असे सारे एका उंचीवरले वातावरण असताना '१०० कोटी रुपये' हा गतसरकारशी जोडला गेलेला आकडा पुन्हा ऐकू येण्याचे काहीही कारण नव्हते. तरीही गेल्या आठवड्यात लहानशा बातमीतून का होईना, '१०० कोटी' हे शब्द पुन्हा नव्या रंगात, नव्या ढंगात महाराष्ट्राच्या राजकारणात प्रवेश करते झाले. काय तर म्हणे, महाराष्ट्रातील कॅबिनेट मंत्रीपदांसाठी कुणा आमदारांकडे १०० कोटी रुपये मागण्यात आले. मुद्दा १०० कोटींचा नसून, बातमी लहानशीच ठरली, हा आहे.

एखादी बातमी फार मोठी ठरत नाही, याला अगदी तांत्रिक कारणेही असतात. एक तर हे पैसे घेण्यासाठी आलेल्या इसमाला मुंबई पोलिसांच्या खंडणीविरोधी पथकाने सापळा रचून पकडले, मग त्याच्याकडून अन्य तिघा साथीदारांचीही नावे कळली.. थोडक्यात, गुन्हे आणि पोलीस यांच्या बातम्या ज्या तऱ्हेने संपणे अपेक्षित असते, तसा शेवट या बातमीचा झाला. मग आता बातमीत आणखी काय लिहिणार? ज्या आमदारांकडे पैसे मागितले गेले त्यांची नावे, ज्या एका आमदाराच्या स्वीय सचिवाने तक्रार नोंदवली त्याचे नाव आणि आरोपींची नावे, हे तपशील बहुतेक प्रसारमाध्यमांनी उघड केले होतेच. तरीही बातमीची लांबी वाढवण्यासारखे काही नसणे, हे झाले तांत्रिक कारण. खंडणीविरोधी पथकाने काय कारवाई केली याबद्दलच्या अन्य प्रसंगी येणाऱ्या बातम्यासुद्धा अशाच असतात, त्या फार लांबरुंद नसतात. म्हणजे ती बातमी आकाराने लहान असण्यात गैर असे काहीही नाही. विशेषत: छापील माध्यमांतील बातम्यांचे आकार लहानमोठे असतातच आणि या आकाराचा संबंध बातमीच्या परिणामकारकतेशी असतोच, असेही नाही. समाज किती सजग आहे, याचाही एखाद्या बातमीची परिणामकारकता ठरवण्यात मोठा असतो. ही बातमी परिणामकारकतेतही 'लहानशीच' ठरली की काय, अशी शंका आज तीन-चार दिवसांनंतर वाचकांसह सर्वांनाच यावी. लोकप्रतिनिधी म्हणून निवडून आलेला एक आमदार, त्याला 'पैसे द्या, मंत्रीपद मिळेल' असा दूरध्वनी करण्याची हिंमत आरोपींमध्ये आली कुठून? संबंधित आमदार महोदयांची भेट मिळवेपर्यंत त्याची मजल गेली कशी? 'मुंबईच्या पोलीस खात्याकडून दरमहा १०० कोटी रुपयांची मागणी महाराष्ट्राच्या गृहमंत्र्यांनी केली' असा आरोप करणारे मुंबईच्या माजी पोलीस आयुक्तांनी लिहिलेले पत्र ज्या महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यांत चर्चेचा विषय ठरले होते.

# ऋण काढून सण कशासाठी?

**गेली दोन वर्षं कोविडमुळे कोणतेही सार्वजनिक सण उत्सव नीटसे साजरे करता आले नाहीत, हे मान्यच. हे लहानमोठे सण उत्सव हा आपल्या सांस्कृतीचा वसा आहे आणि आयुष्यातल्या आनंदाचे निमित्तही आहेत, हेही खरेच.**

पण तेवढेच सत्य हेदेखील आहे की, आपल्यापैकी अनेकांच्या घरात दर पावसाळ्यात पाणी शिरते, घरातले कोणीतरी लोकलमध्ये तासनतास अडकून पडते, ताटातले मासे दिवसागणिक परवडेनासे होत आहेत आणि पुरामुळे भाज्याही खिशाला कात्री लावू लागल्या आहेत. विदर्भ-मराठवाड्यातल्या पुरांपासून युरोपातल्या उष्णतेच्या लाटेपर्यंत सारे काही एकमेकांशी जोडलेले आहे.



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी पत्रकार परिषद घेतली आणि उत्सव निर्बंधमुक्त केल्याची घोषणा केली. नियमांचा बाऊ करू नका, गणेशोत्सव मंडळांवरील ध्वनिप्रदूषण वगैरेंसारखे 'लहान-मोठे' खटले मागे घ्या, असे आवाहन प्रशासनाला केले. मूर्तींच्या उंचीवर निर्बंध नसतील आणि प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींसंदर्भात निर्णय घेण्यासाठी तज्ज्ञांची समिती नेमली जाईल, असेही सांगितले. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी म्हणजे शुक्रवारी करोनामुळे विशेष बाब म्हणून यंदा प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींना परवानगी देण्यात येईल आणि ही बंदी २०२३ पासून लागू होईल, अशी घोषणा झाली.खरेतर उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालयापासून, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ, राष्ट्रीय हरित लवाद अशा सर्व संबंधित संस्थांनी प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्ती पर्यावरणासाठी घातक असल्याचे वारंवार स्पष्ट करत त्यावर बंदी घातली आहे. तरीही दरवर्षी हजारोंच्या संख्येने पीओपीच्या मूर्ती समुद्र, नद्या, तलावांत विसर्जित केल्या जातात. हा न्यायालयाचा अवमान ठरत नाही का? कृत्रिम तलावांसारखे पर्याय देण्यात आले असले तरीही ते प्रत्येक ठिकाणी उपलब्ध असतातच असे नाही. यंदा मूर्तींच्या उंचीवरचे निर्बंधही उठवण्यात आले आहेत. अनेक मंडळे १०-१२ फुटांच्या मूर्तींची स्थापना करतात आणि त्या शाडूच्या असल्याचा दावा करतात. प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींना न्यायालयानेही मज्जाव केलेला आहे. त्याला यंदापुरती स्थगिती द्या, अशी मागणी पुन्हा होते आहे.

## ।। अभंगवाणी ।।



आहे तें सकळ कृष्णा चि अर्पण ।
न कळतां मन दुजें भावी ॥१॥
म्हणउनी पाठी लागतील भूतें ।
येती गवसीत पांचजणें ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

**स्मार्ट** सिटी... च्या दिशेने वाटचाल करणारे पिंपरी-चिंचवड शहर अर्थात आशिया खंडातील सर्वात श्रीमंत महानगरपालिका. महाराष्ट्राचे शैक्षणिक आणि सांस्कृतिक माहेरघर म्हणून पुणे विकसित झाले. तसेच, महाराष्ट्राची औद्योगिक आणि आयटी हब म्हणून पिंपरी-चिंचवड प्रगतीपथावर आहे, ही वस्तुस्थिती मान्य करावी लागेल. या प्रगतीमध्ये अनेक कर्तुत्वसंपन्न नेते, सामाजिक कार्यकर्ते यांचे योगदान आहे. असाच नव्या पिढीचा युवा शिलेदार म्हणून **भारतीय जनता पार्टीचे संघटन सरचिटणीस अमोल थोरात** यांचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल.







# पिंपरी-चिंचवड भाजपाचा कुशल संघटक : अमोल थोरात!

*पिंपरी-चिंचवड शहराच्या विकासात अनेकांचे योगदान आहे.* ***स्व. अण्णासाहेब मगर*** *यांच्यापासून सुरू झालेल्या शहराच्या नेतृत्वाचा वेलू आता* ***आमदार लक्ष्मण जगताप- महेश लांडगे*** *यांच्यापर्यंत पोहोचला आहे. यापुढील काळात ही धुरा* ***अमोल थोरात*** *यांच्यासारख्या नव्या दमाच्या शिलेदारांवर राहणार आहे. शहरातील भाजपाची वाटचाल कशी झाली? यावर दृष्टीक्षेप टाकला तर आपल्या लक्षात येते की, अवघे* ***3 नगरसेवक*** *असलेला हा पक्ष शहरातील बलाढ्य सत्ताधारी बनला. आजच्या घडीला शहरात पक्षाकडे* ***दोन विधानसभा आमदार, 1 विधान परिषद आमदार आणि 77 नगरसेवकांची*** *ताकद आहे. एकेकाळ प्रचंड शक्तीशाली असलेल्या राष्ट्रवादीला पराभूत करणे निश्चितच सोपे नव्हते.* ***3 चे 77*** *नगरसेवक होण्यासाठी* ***प्रचंड संघर्ष*** *करावा लागला. त्यासाठी सुरुवातीपासून* ***भाजपाचा झेंडा*** *खांद्यावर ज्या काही मोजक्या लोकांनी घेतला. त्यांनी अनेक वर्षे संघर्ष केला. त्यामुळेच* ***भाजपाला आज विजयाची*** *फळे चाखण्याची संधी मिळाली.*









**पंतप्रधान** नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा हे जगातील बलाढ्य सत्ताधीश असले, तरी त्यांची खरी ताकद भाजपाच्या निष्ठवंत कार्यकर्त्यांमध्ये आहे, ही बाब अनेकदा या प्रभावी नेत्यांनी जाहीरपणे मान्य केली. असाच... कट्टर, निष्ठावंत आणि प्रखर राष्ट्रप्रेमी युवा चेहरा पिंपरी-चिंचवडच्या राजकारणात गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेत आहे तो म्हणजे संघटन सरचिटणीस अमोल थोरात. शहर भाजपाचे अभ्यासू व्यक्तीमत्व... एक सयंमी, शांत आणि आभ्यासू असे व्यक्तीमत्व म्हणून अमोल थोरात यांची भाजपासह राजकीय वर्तुळात ओळख आहे. सर्वसाधारण कुटुंबात जन्मलेले, पण मनात जर जिद्द असेल तर माणूस कोणतेही कष्ट करण्यास तयार असतो, असेच काहीशे अमोल थोरातांच्या बाबतीत घडले. ते स्वतः उच्चशिक्षीत तर आहेतच, परंतु त्यांनी इतरांनाही शिक्षणाची प्रेरणा दिली. त्यांनी डिप्लोमा इन मेकॅनिकल इंजिनिअर केले.

बालपणापासून स्वयंसेवक संघाची शिकवण त्यांच्या अंगी असल्यामुळे त्यांनी समाज कार्यात स्वतःला वाहून घेतले. भाजपाचे एक निष्ठावंत कार्यकर्ते झाले.

## उपमुख्यमंत्री, प्रदेशाध्यक्षांचा विश्वासू युवा नेता...

अमोल थोरात हे उपमुख्यमंत्री दवेंद्र फडणवीस आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रकांतदादा पाटील यांचे खास विश्वासू त्यामुळे त्यांनी आजपर्यंत टाकलेल्या जबाबदाऱ्या त्यांनी यशस्वीरित्या पार पाडल्या. संघटन सरचिटणीस म्हणून त्यांनी तीन टर्म तसेच सहा वर्षे प्रवक्ता ही जबाबदारी अत्यंत यशस्वी रित्या पार पाडली. आपण ज्यावेळी एखादे झाड लावतो, त्यावेळी त्याच्याकडून फळाची अपेक्षा होणे सहाजिकच आहे. मात्र अमोल थोरातांनी पक्ष वाढसाठी आणि पक्ष संघटनेसाठी नेहमीच अग्रेसर राहिले आहेत. मात्र, त्यांनी कधीच कोणत्याही पदाची अपेक्षा केली नाही. त्यांनी स्वतःला झोकून देवून पक्ष संघटन उभे करून शहरात भारतीय जनता पक्षाचा पाया मजबुत केला. शहरातील तरूणांचे प्रश्न सोडविण्यासाठी ते नेहमीची पुढाकार घेतला. शहरातील भाजप सदस्य नोंदणीचे ते प्रमुख म्हणून काम पाहिले आणि त्यांनी शहरातून मोठ्या संख्येने सदस्य नोंदणी करून घेतली. हे त्यांच्या कामाची पोचपावती म्हणावी लागेल.

राम- लक्ष्मण जोडीतील महत्त्वाचा दुवा...

भोसरीचे आमदार महेशदादा लांडगे आणि चिंचवड विधानसभेचे आमदार लक्ष्मणभाऊ जगताप यांच्या मर्जीतील म्हणून देखिल त्यांची ओळख आहे. म्हणूनच त्यांना दादा आणि भाऊ यांना जोडणारा दुवा असे संबोधले जाते. अमोल थोरात हे भाजपाचे एकनिष्ठ आणि सच्चे कार्यकर्ते आहेत. शहरातील बुथ रचनेचे प्रमुख म्हणून देखिल त्यांनी आपली जबाबदारी अतिशय चोखपणे पार पाडली. त्यांच्याकडे एक तरूण नेतृत्व म्हणून पाहिले जाते. सर्वांना बरोबर घेऊन काम करण्याची त्यांची पध्दत यामुळे ते शहरातील जनमाणसांच्या हृदयात घर करून बसले आहे. त्यांनी दोन लोकसभा आणि दोन विधानसभा असे काम केले आणि त्यांनी आपल्या कामाची चुणूक दाखवून गेले. २०१९ च्या मावळ लोकसभा मतदार संघाच्या समन्वयक म्हणून त्यांच्यावर पक्षांने टाकलेली जबाबदारी पार पाडून पुन्हा एकदा आपण पक्षाशी एकनिष्ट आहोत हे दाखवून दिले.

प्रशासनात दबदबा असलेला कार्यकर्ता...

महापालिकेतील कोणत्याही महत्त्वाच्या पदावर नसतानाही प्रशासनावर अचूक पकड असलेला कार्यकर्ता अशीच अमोल थोरात यांची ओळख आहे. महापालिकेतील कोणत्याही विभागाच्या दालनात त्यांच्या नावाला विशेष आदर आहे. अधिकारी, कर्मचारी यांच्यामध्ये असलेला संपर्क आणि सामान्य नागरिकांच्या हक्कांसाठी लढण्याची वृत्ती यामुळे प्रशासनातील व्यक्तींकडून थोरात यांना कायम आदरभाव मिळतो. थोरात हे चुकीच्या कामांना विरोध आणि चांगल्या कामांचे नेहमीच कौतुक करतात. त्यांचा स्पष्टोक्तिपणा यामुळे ते आज संपुर्ण शहरात परिचित आहेत.

## ‘१०० पार’ चा नारा देणारा आत्मविश्वासू नेता...

राज्यात २०१९ मध्ये महाविकास आघाडीची सत्ता आली. त्यानंतर महापालिकेतील सत्ताधारी भाजपामध्ये अंतर्गत अस्वस्थता जाणवू लागली. त्यावेळी संघटन सरचिटणीस म्हणून अमोल थोरात यांनी प्रतिकूल परिस्थितीतही कार्यकर्त्यांचा आत्मविश्वास ढळू दिला नाही. पक्ष विरोधी बाकावर असतानाही आणि भाजपातील २५ ते ३० नगरसेवक राष्ट्रवादीत प्रवेश करतील अशी चर्चा सुरू असताना अमोथ थोरात यांनी ‘अब की बार १०० पार’ चा नारा दिला होता. कितीही प्रतिकूल परिस्थिती असताना संघटन प्रमुखाने खचून न जाता धिराने लढा कसा द्यावा? हेच थोरात यांनी दाखवून दिले. पिंपरी-चिंचवडच्या विकासाचे शिलेदार म्हणून आगामी काळात अमोल थोरात यांची वाटचाल यशस्वी होईल, यात शंका नाही.

**राष्ट्र प्रथम... नंतर पक्ष आणि शेवटी स्वयं... या विचाराने कार्यरत असलेले श्री. अमोल थोरात यांना वाढदिवसाच्या निमित्ताने हार्दिक शुभेच्छा..!**

## शॉर्ट न्यूज »

### मुंबईला दोन वर्षात खड्डेमुक्त करणार

।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

मुंबईला येत्या दोन वर्षात खड्डेमुक्त करणार असल्याची माहिती राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली. मुंबई महापालिकेच्या अधिकाऱ्यांशी आज एकनाथ शिंदे यांनी बैठक घेतली. या बैठकीमध्ये मुंबईला पुढील २ वर्षात खड्डेमुक्त करण्यासाठी योजना आखण्यात आली. दरवर्षी मुंबईत जास्तीचा पाऊस झाल्यास मुंबईची तुंबई होते. पावसाचे पाणी साचल्याने रस्त्यांवर खड्ड्यांचे साम्राज्य निर्माण होते. परिणामी अपघातांना आमंत्रण दिले जाते. त्यामुळे आता या त्रासातून मुंबईकरांची सुटका करण्यासाठी शिंदेंनी नव्या उपाययोजना केल्या जाणार आहेत. महापालिका अधिकाऱ्यांसोबतच्या बैठकीनंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रसारमाध्यमांशी बातचित केली. यावेळी त्यांनी "४२३ किलोमीटरचे रस्ते सिमेंट-कॉक्रिंटचे करण्यात येणार आहेत. यासाठी मार्च २०२३ पर्यंत निविदा काढण्याच्या सूचना

# मनावर दगड ठेवून भाजपाने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले

## चंद्रकांत पाटील यांच्या वक्तव्यामुळे राज्याच्या राजकीय वर्तुळात विविध चर्चांना उधाण

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज ।प्रतिनिधी।

"मनावर दगड ठेवून भाजपाचे केंद्रीय नेतृत्व आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री केले. त्यामुळे आपल्याला अतिशय दुख झाले.", असे प्रतिपादन भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी केले. या वक्तव्याचे राजकीय वर्तुळात तीव्र पडसाद उमटले आहेत.

भाजपाच्या प्रदेश कार्यकारिणी व कार्यसमितीच्या पनवेल येथे झालेल्या बैठकीचे उद्घाटन प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी केले. त्यावेळी महाराष्ट्र प्रभारी व राष्ट्रीय सरचिटणीस सी. टी. रवी, सह सरचिटणीस शिवप्रकाश, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे आणि राष्ट्रीय व प्रदेश स्तरावरील अनेक नेते बैठकीस उपस्थित होते. या निर्णयामुळे आपल्या सर्वांना दुःख झाले -"भाजपा व शिवसेना युतीला २०१९ मधील निवडणुकीत बहुमत मिळूनही शिवसेनेने विश्वासघात करून



महाविकास आघाडी सरकार स्थापन केले. करोना काळात जनतेचे खूप हाल झाले. सरकारविरोधात कोणी टिप्पणी केल्यास तुरुंगात डांबले गेले. राज्याची विकास गती मंदावली. गेल्या अडीच वर्षातील चित्र पाहिल्यानंतर राज्यात सत्ता बदलण्याची गरज होती आणि तसा बदल झाला. हा बदल होत असताना योग्य संदेश जाईल आणि चांगल्या निर्णयांना स्थिरता देईल, असा एक नेता देण्याची गरज होती. त्यामुळे मनावर दगड ठेवून फडणवीस आणि केंद्रीय नेतृत्वाने एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे आपल्या सर्वांना दुःख झाले. वसंतराव नाईक यांच्यानंतर सलग पाच वर्षे मुख्यमंत्री राहिलेले देवेंद्र फडणवीस होते. त्यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे, असा निर्णय केंद्रीय नेतृत्वाने दिला आणि तो फडणवीस यांनी मान्य केला." असे विधान चंद्रकांत पाटील यांनी केले. प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी केलेल्या आवाहनानुसार फडणवीस यांच्या त्यागाबद्दल सर्वांनी त्यांना उभे राहून अभिवादन केले. प्रदेशाध्यक्ष पाटील यांनी फडणवीस यांच्याबद्दल गौरवोद्गार काढल्यावर पक्षनिर्णयाविरोधात मतप्रदर्शन करणाऱ्या नेत्यांना व कार्यकर्त्यांना खडे बोल सुनावले. राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे यांना विधानपरिषदेची उमेदवारी न मिळाल्याने त्यांच्या समर्थकांनी तीव्र प्रतिक्रिया व्यक्त केल्या होत्या. या पार्श्वभूमीवर कोणाचाही नामोल्लेख न करता पाटील म्हणाले, "फडणवीस यांनी त्याग केला. पण आपलीही काही जबाबदारी आहे. नगरपालिका किंवा कुठेही उमेदवारी मिळाली नाही की कार्यालय फोडायचे, रूसून बसायचे, हे योग्य नाही. सरकार आज आले, पण भाजपा पक्ष म्हणून मजबूत होता, आहे व राहील. पक्षाच्या नेत्यांवर श्रध्दा ठेवा. काहीजण ओक्साबोक्शी रडले. मनाचा मोठेपणा हे आपले वैशिष्ट्य आहे.

### भाजपाची सारवासारव

**यानंतर ' ते ' प्रदेशाध्यक्षांचे मत नसून त्यावेळी घडलेल्या घडामोडी व प्रसंगाबाबत कार्यकर्त्यांच्या मनातील भावार्थ प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी व्यक्त केला, असे स्पष्टीकरण भाजपातर्फे आमदार आशिष शेलार यांनी पत्रकारांशी बोलताना केले.**

**भाजपा नेतृत्वाने मनावर दगड ठेवून एकनाथ शिंदे यांना मुख्य मंत्री केले, असे वक्तव्य पाटील यांनी केल्यावर राजकीय वर्तुळात खळबळ माजली. त्यानंतर शेलार यांनी पत्रकारपरिषदेत त्याबाबत स्पष्टीकरण केले. तसेच, पाटील यांच्या भाषणाची ध्वनिचित्रफीत भाजपाने समाजमाध्यमांवरून तातडीने काढून टाकली. ही ध्वनिचित्रफीत कशी व का बाहेर आली, हा आमचा अंतर्गत प्रश्न असून तो सोडविला जाईल, असेही शेलार यांनी स्पष्ट केले.**

# शिवसेना फुटीला भाजपा जबाबदार की शरद पवार?- राज ठाकरे

## शिवसेनेतील बंडखोरीवरून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका

।नवी दिल्ली ।महाईन्यूज ।
वृत्तसंस्था ।

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी शिवसेनेतील बंडखोरीवरून शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर सडकून टीका केलीय. शिवसेनेतील बंडखोरीनंतर यामागे देवेंद्र फडणवीसांसह भाजपावर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवारांवरही आरोप झाले. यावरून शिवसेनेतील फुटीला भाजपा जबाबदार आहे की शरद पवार जबाबदार या प्रश्नावरही राज ठाकरे बोलले. ते झी २४ तासला दिलेल्या मुलाखतीत बोलत होते.

राज ठाकरे म्हणाले,



"बाळासाहेब ठाकरे असते तर शिवसेनेत बंडखोरी झालीच नसती. ते शक्यच नव्हतं. शिवसेना एक पक्ष म्हणून पाहू नका. बाळासाहेब होते तोपर्यंत शिवसेनेत बाळासाहेबांच्या विचाराने माणसं बांधली गेली होती. बाळासाहेब होते तोपर्यंत तो विचार होता आणि त्या विचाराने बांधलेली ती माणसं होती. त्यामुळे बाळासाहेब असते तर बंडखोरी झालीच नसती." "मी देवेंद्र फडणवीसांना उगाच फुकटचं श्रेय घेऊ नका असं सांगितलं"

"माझ्याकडे देवेंद्र फडणवीस आले होते. मी त्यांना म्हटलं उगाच फुकटचं श्रेय घेऊ नका. ते जोरजोरात हसायला लागले. जी गोष्ट घडली ती गोष्ट ना फडणवीसांनी घडवली, ना अमित शाहांनी घडवली, ना भाजपाने ना अजून कोणी घडवली," असं राज ठाकरे म्हणाले.

"संजय राऊतांच्या वक्तव्यांनी आमदार फुटत नसतात," असं म्हणत राज ठाकरेंनी संजय राऊतांवरही टोला लगावला.

याचं श्रेय तुम्हाला उद्धव ठाकरेंनाच द्यावं लागेल. कारण त्यांच्यामुळे हे एकदा घडलेलं नाही. आज आमदार बाहेर पडले तेव्हा आणि मी बाहेर पडलो तेव्हाही कारणं हीच होती. मध्यंतरी आणखी काही लोक सोडून गेले तेव्हीही

### दोन जिल्हे अबाधित राखायला मी समर्थ" बंडखोर आमदारांविरोधात अनंत गिते आक्रमक

।नवी दिल्ली ।
महाईन्यूज ।वृत्तसंस्था ।

शिवसेनेचे ज्येष्ठ नेते एकनाथ शिंदे यांच्यासह ४० आमदारांनी बंडखोरी केल्यामुळे शिवसेना पक्षात फूट पडली आहे. यानंतर आता शिवसेनेनं पुन्हा एकदा पक्षबांधणीला सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेना नेते आदित्य ठाकरे महाराष्ट्र दौऱ्यावर गेले आहेत. तर शिवसेना नेते अनंत गितेदेखील रायगड आणि रत्नागिरी दौऱ्यावर गेले आहे. शिवसेना संकटात असताना, पक्षाच्या पाठीशी उभं राहणं, ही माझी नैतिक जबाबदारी असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. रायगड-रत्नागिरी दौऱ्यादरम्यान ते पत्रकार परिषदेत बोलत होते.

पत्रकार परिषदेत बोलताना गिते म्हणाले, "इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या माध्यमातून बंडखोरीची बातमी जेव्हा कळली, तेव्हाच



मी स्वत: रायगड आणि रत्नागिरी जिल्ह्याचा दौरा करण्याचा निर्णय घेतला. दौऱ्याला जाण्यापूर्वी मी उद्धव ठाकरेंना फोन करून याची कल्पना दिली. मी आता रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर जात आहे. या दोन जिल्ह्यांची जबाबदारी मी स्वीकारली आहे. हे दोन्ही जिल्हे अबाधित राखायला मी समर्थ आहे. त्यामुळे जी बंडखोरी झाली आहे, त्याची चिंता तुम्ही अजिबात करू नका, असा विश्वास मी त्यांना दिला" अशी माहिती अनंत गिते यांनी दिली. दुर्दैवाने या दोन जिल्ह्यातून रायगडचे तीन आणि रत्नागिरीचे दोन अशा पाच आमदारांनी बंडखोरी केली आहे.

# इंद्रा दिपूच्या हळदीचे खास फोटो.. आज रंगणार विवाह सोहळा..




'झी मराठी' वरील मन उडू उडू झालं ही मालिका जेव्हा पासून सुरू झाली आहे तेव्हापासूनच तिनं लोकांच्या मनाचा ठाव घेतला. या मालिकेतील इंद्रा आणि दीपू यांची जोडी भलतीच लोकप्रिय ठरली. तरुणांनाच नाही तर घराघरात ही मालिका पाहिली जात होती. सुरुवातीपासूनच मालिकेचा टीआरपी ही चांगला आहे, असे असले तरी ही मालिका आता प्रेक्षकांचा निरोप घेणार आहे. इंद्रा आणि दीपू यांच्या विवाह सोहळ्याने हा शेवट होईल. त्यामुळे मालिकेत नुकतीच त्यांची हळद पार पडली. त्याचे हे खास फोटो..

# स्वतःचे चित्रपट पाहायला मला आवडत नाही, दिशा पाटणीचा दावा

दिशा पाटणी लवकरच एक व्हिलन रिटर्न्स चित्रपटात दिसणार आहे. यात दिशा व्यतिरिक्त जॉन अब्राहम, अर्जुन कपूर आणि तारा सुतारिया मुख्य भूमिकेत आहेत. हा चित्रपट २०१४ मध्ये प्रदर्शित झालेला हिट एक व्हिलनचा रिमेक आहे. एक व्हिलन रिटर्न्सचे (EK VILLAIN RETURNS) सर्व कलाकार चित्रपटाचा जोरदार प्रमोशन करत आहे. नुकत्याच एका मुलाखतीत दिशा म्हणाली होती, की ती आपली चित्रपट पाहात नाही. स्वतःला पाहणे आवडत नसल्याचे ती म्हणाली दिशा पाटणी (DISHA PATANI) म्हणते, मला स्वतःला पाहणे आवडत नाही. मी स्वतःला पाहू शकत नाही. वास्तविक मला स्वतःला पाहणे आवडत नाही. कारण मला चांगले वाटत नाही. जेव्हा कधी मी माझे चित्रपट पाहाते, त्यावेळेस अर्धा चित्रपट होईपर्यंत डोळे हाताने बंद करुन ठेवते. दिशाने बॉलीवूडमध्ये 'एम एस धोनी द अनटोल्ड स्टोरी' यातून पदार्पण केले आहे. यात दिशाबरोबर सुशांत राजपूत मुख्य भूमिकेत होता. यापूर्वी ती तेलगू चित्रपट लोफरमध्ये दिसली होती. त्यानंतर दिशाने बागी २, भारत, मलंग, बागी ३ आणि राधे यात काम केले आहे.



# रूप नगर के चिते : गोंधळात टाकणारा टीझर




मैत्रीवर आधारलेला 'रूप नगर के चिते' हा आगामी मराठी चित्रपट लवकरच आमच्या भेटीला येत आहे. प्रत्येक नात्याचा एक राखीव कोपरा असतो. यात एक ख़ास कोपरा मैत्रीचाही असतो. आपल्या सुख दु:खात सदैव आपल्या सोबत असणारी व्यक्ती म्हणजे मित्र... आयुष्याच्या चढउतारात मन हलकं करायला मैत्रीचं नातं हवं असतं. म्हणून आपल्याभोवती मैत्रीचा दरवळ असेपर्यंतच, आपल्या मनातल्या मैत्रीच्या या कोपऱ्याचं स्थान किती महत्त्वाचं आहे हे त्यांना व्यक्त करून सांगणं गरजेचं असतं. हाच आशय 'रूप नगर के चीते' या आगामी मराठी चित्रपटातून अधोरेखित करण्यात आला आहे. नुकताच या चित्रपटाचा टीझर प्रदर्शित झाला. तो पाहून प्रेक्षकांची भलतीच उत्सुकता शिगेला गेली आहे.

# गोष्ट एका पैठणीची' आणि 'जून' चित्रपटाचं कौतुक

मराठी सिनेसृष्टीसाठी अभिमानास्पद गोष्ट घडली आहे चित्रपट क्षेत्रातील विविध विभागातील मान्यवरांना दरवर्षी राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात येते. यंदाच्या ६८व्या राष्ट्रीय चित्रपट पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. या वर्षीचा सर्वोत्कृष्ट मराठी चित्रपट पुरस्कार शंतनु गणेश रोडे दिग्दर्शित 'गोष्ट एका पैठणीची' या चित्रपटाला




प्रदान करण्यात आला असून सर्वोत्कृष्ट अभिनेत्याचा स्पेशल ज्युरी मेंशन अवॉर्ड 'जून' चित्रपटासाठी सिध्दार्थ मेनन याला मिळाला आहे. 'गोष्ट एका पैठणीची' आणि 'जून' या दोन्ही चित्रपटांची निर्मिती 'प्लॅनेट मराठी'ची असून गोष्ट 'एका पैठणीची' मध्ये सायली संजीव आणि सुव्रत जोशी प्रमुख भूमिकेत आहे. तर या चित्रपटाची निर्मिती अक्षय बर्दापूरकर, अभयानंद सिंग यांनी केली आहे. याच संदर्भात सायली संजीव प्रतिक्रिया देत असताना म्हणाली, "चित्रपटातील कामाचे चीज झाले आहे. चित्रपटासाठी मी विशेष मेहनत घेतली आहे. माझ्यासाठी चित्रपट खूप स्पेशल आहे. मी हा पुरस्कार माझ्या वडिलांना समर्पित करते." तर चित्रपटाचे दिग्दर्शक शंतनु रोडे म्हणतात, "माझ्यासाठी ही आनंदाची गोष्ट आहे. याचे श्रेय संपूर्ण टीमला जाते. सगळ्यांनीच यासाठी प्रामाणिक प्रयत्न केले आणि आज स्वप्न पूर्ण झाले." सायली संजीव सोबतच अभिनेता सिद्धार्थ मेनन म्हणाला, "मला राष्ट्रीय पुरस्कार मिळाल्याचा आनंद होतोय. स्वप्न पूर्ण झाल्यासारखे वाटतेय. हा पुरस्कार मी आमच्या चित्रपटाच्या संपूर्ण टीमला समर्पित करतो.

# आशिक बनाया आपने'.. हे गाणं आलं आणि हिमेश रेशमियाचे दिवस पालटले..

गायक आणि अभिनेता अशी ख्याती असलेला हिमेश रेशमियायाचा आज 49 वा वाढदिवस. हिमेशने मिळालेल्या प्रसिद्धीवर चित्रपटातही आपले नशीब आजमावले. पण एक वेळ अशी होती की हिमेशच्या स्टाइलची, पेहरावाची आणि पर्यायाने गाण्याची बरीच थट्टा केली गेली. पण एका गाण्याने त्याचे नशीब पालटले आणि बॉलीवुड मधील नामांकित गायकांच्या यादीत त्यांचे नाव कोरले गेले. आपल्या अनोख्या आवाजाने श्रोत्यांच्या मनावर वेगळी छाप सोडणाऱ्या हिमेश रेशमियाचे आयुष्य एखाद्या चित्रपटासारखे आहे. 'आशिक बनाया' , 'झलक दिखला जा', 'हुक्का मार' अशा एकापेक्षा एक सुपरहिट गाण्यांनी चाहत्यांना वेड लावणारा हिमेश रेशमिया एकेकाळी डावलला गेला होता. हिमेशने गाण्याचा एक वेगळा ठसा संगीत विश्वात निर्माण केला. हिमेश रेशमियाने आपल्या जिद्दीवर गायन, संगीत दिग्दर्शन आणि अभिनयातही पाय रोवले. जवळपास 20 वर्षे तो संगीत क्षेत्रात काम करत आहे. तो केवळ गायक नही तर तो माणूस म्हणूनही तितकाच मोठा आहे. हिमेशने अनेक गरजूंना मदत केली आहे. एवढेच नाही तर रस्त्यावर गाणे गाऊन पोट भरणाऱ्या राणू मंडल यांनाही त्याने मदत केली. आज हिमेश रेशमिया याला एक मानाचे स्थान मिळाले असते तरी त्यांच्या 'आशिक बनाया'ची किमया आजही कायम आहे, जया गाण्याने त्याला ओळख मिळवून दिली होती. या गाण्यात इम्रान हाशमी आणि तनुश्री दत्ताचा कीसिंग सीन चांगलाच गाजला होता.



## शॉर्ट न्यूज »

### भालाफेकपटू अनु राणीचे पदक थोडक्यात हुकले



तैपेई।। महाईन्यूज

जागतिक ॲथलेटिक्स चॅम्पियनशिपच्या अंतिम फेरीत भारताची स्टार भालाफेकपटू अनु राणीच्या हाती निराशा लागली. अंतिम फेरीत अनु राणीचे पदक थोडक्यात हुकले. राणी सातव्या क्रमांकावर राहिली. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत तिसऱ्यांदा सहभागी होत असलेल्या अनुने सलग दुसऱ्यांदा जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेची अंतिम फेरी गाठली होती. अनु राणीने अंतिम स्पर्धेत 61.12 मीटर भालाफेक करून सातवे स्थान पटकावले. या स्पर्धेत सुवर्णपदक ऑस्ट्रेलियाच्या केल्सी ली बार्बरला मिळाले, ज्याने 66.91 मीटर भालाफेक करून सुवर्णपदक जिंकले. रौप्यपदक अमेरिकेच्या कारा विंगरला मिळाले तर कांस्यपदक जपानच्या हारुका किटागुचीला मिळाले. अनु राणीच्या सहा प्रयत्नांमध्ये तिचा दुसरा प्रयत्न सर्वोत्कृष्ट होता.

# सलामीवीर शुभमन गिलचे वनडेत पहिले अर्धशतक!

## सचिन तेंडुलकरचा मोडला 'तो' विक्रम

।नवी दिल्ली।
महाईन्यूज ।



भारतीय संघ सध्या वेस्ट इंडिज दौऱ्यावर असून यांच्यात वनडे मालिका सुरू आहे. तीन वनडे सामन्यांच्या मालिकेती पहिला सामना शुक्रवारी झाला. या सामन्यात भारताने ३ धावांनी वेस्ट इंडिजला पराभूत केले. भारताने प्रथम फलंदाजी करताना ५० षटकात ३०८ धावा केल्या. यात कर्णधार शिखर धवन, शुभमन गिल आणि श्रेयस अय्यर यांनी अर्धशतकी खेळी केली. यामधील शुभमन गिलचे अर्धशतक त्याच्या वनडे कारकिर्दीतले पहिले अर्धशतक ठरले आहे. सलामीवीर शुभमन गिलने पहिल्या वनडे सामन्यात अर्धशतकी खेळी केली. त्याचे हे अर्धशतक वनडे क्रिकेट कारकिर्दीतील पहिले ठरले. या अर्धशतकी खेळीसह त्याने मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकर याचा एक विक्रम मोडीत काढला आहे. वेस्ट इंडिजमध्ये एकदिवसीय क्रिकेटमध्ये सर्वात कमी वयात अर्धशतक करत भारतीय क्रिकेटपटूंच्या यादीत सचिनला मागे टाकले आहे. शुभमन गिलने २२ वर्षे ३१७ दिवस वय असताना पहिलं अर्धशतक केलं आहे. याआधी सचिनने वेस्ट इंडिजमध्ये वयाच्या २४ व्या वर्षी अर्धशतक केलं होते. याशिवाय, शुभमन गिलने सचिनला मागे टाकले असले तरी त्याच्यापुढे विराटचे नाव या यादीत अव्वल आहे. भारताचा माजी कर्णधार विराट कोहली याने २०१० मध्ये २२ वर्षे २०१५ दिवस इतके वय असताना वेस्ट इंडिजमध्ये अर्धशतक केले होते. त्यावेळी विराट कोहली सर्वात अव्वल होता.

दरम्यान, शुक्रवारी झालेल्या सामन्यात भारताने दिलेल्या आव्हानाचा पाठलाग करताना वेस्ट इंडिजला ३०५ धावा करता आल्या. या विजयासह भारताने तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेत १-० ने आघाडी मिळवली आहे. शुभमन गिलने पहिल्या वनडे सामन्यात ६४ धावांची खेळी केली होती. शुभमन गिलने आतापर्यंत केवळ तीनच वनडे सामने खेळले आहेत.

# मुंबई इंडियन्सच्या बेबी एबीचा इंग्लंडमध्ये धमाका

## चोपल्या 49 चेंडूत 112 धावा

।लंडन ।
महाईन्यूज ।



मुंबई इंडियन्सचा युवा खेळाडूंचा ताफा सध्या इंग्लंडमध्ये पुढच्या आयपीएल हंगामाची तयारी करत आहे. मुंबई इंडियन्सने इंग्लंडमधील क्लब डरहम विरूद्ध सराव सामने खेळत आहे. मुंबई इंडियन्स (MUMBAI INDIANS) आपल्या संघातील युवा भारतीय आणि काही विदेशी खेळाडूंना तीन महिन्यांच्या इंग्लंड दौऱ्यावर घेऊन गेली आहे. इंग्लंडमध्ये हा युवा संघ रिलायन्स क्रिकेट टीमच्या नावाने सराव सामने (PRACTICE MATCH) खेळत आहे. 22 जुलैला डरहस विरूद्ध झालेल्या सामन्यात रिलायन्स क्रिकेट टीमने 81 धावांनी विजय मिळवला. यात बेबी एबी (BABY AB) डेवाल्ड ब्रेविसने (DEWALD BREVIS) धमाकेदार कामगिरी केले. त्याने 49 चेंडूत 112 धावांची धमाकेदार खेळी केली. यात 6 चौकार आणि 9 षटकार मारले.

रिलायन्सने या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना 20 षटकात 9 विकेट गमावून 211 धावा केल्या. यानंतर डरहम क्रिकेट टीमला फक्त 130 धावात गुंडाळले. या सामन्यात अर्जुन तेंडुलकर देखील खेळला होता. त्याने 3 षटकात 27 धावा दिल्या. इंग्लंड दौऱ्यावर गेलेली युवा मुंबई इंडियन्स म्हणजेच रिलायन्स क्रिकेट टीमने सलग 8 सामने जिंकले. आयपीएलच्या 2022 च्या हंगामात मुंबई इंडियन्सची कामगिरी फारशी चांगली झाली नाही. मुंबई इंडियन्स गुणतालिकेत तळात होती. त्यामुळे संघ व्यवस्थापनाने काही खेळाडूंना इंग्लंड दौऱ्यावर घेऊन गेले आहेत. या दौऱ्यावर हे खेळाडू मॅच प्रॅक्टिस करणार आहेत. मुंबई इंडियन्सने 2023 च्या हंगामाची सुरूवात आतापासूनच केली आहे. सध्या भारतात देशांतर्गत क्रिकेटमध्ये ऑफ सिजन सुरू आहे.


महाईन्यूज
जाहिरात आणि बातम्यांसाठी संपर्क
708 309 8763

महाईन्यूज नोंद असू द्या..
महाईन्यूजची डिजीटल आवृत्ती छपाईसाठी नाही